महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई - मेल : cecomm@mahadiscom.in

**क्र. पी.आर-३/सबसिडी/** No 01229 **दिनांक :** 17 JAN 2018

## वाणिज्य परिपत्रक क्र. 300

**विषय** :- सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करुन विविध उपाय योजना व मदत जाहीर करण्याबाबत.
--- कृषिपंपाच्या चालू वीज बिलात ३३.५% सूट व टंचाई जाहीर केलेल्या गावांत शेतक-यांच्या शेतीपंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

**संदर्भ** :- शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०१७/प्र.क्र.१७३/म-७ दि.३०.१०.२०१७

शासनाने संदर्भातील शासन निर्णय दि. ३०.१०.२०१७ नुसार सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करुन विविध उपाय योजना व मदत जाहीर केली आहे. शासनाने सदर निर्णयानुसार गोंदिया जिल्हयातील गोंदिया, तिरोडा व गोरेगांव या तीन तालुक्यांमध्ये मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहीर करुन खालीलप्रमाणे सवलती लागू करण्याबाबत निर्देशित केले आहे.

१) कृषिपंपाच्या चालू वीज बिलात ३३.५% सूट
२) टंचाई जाहीर केलेल्या गावांत शेतक-यांच्या शेतीपंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी दि.३१.१०.२०१७ पासून करण्यात यावी व शासनाने हे आदेश रद्द न केल्यास पुढील सहामहिन्याच्या कालावधीपर्यंत लागू राहतील.

सहपत्र - वरीलप्रमाणे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**
**प्रादेशिक संचालक, महावितरण, नागपूर .**

**प्रत सस्नेह रवाना :-**
१) मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ, गोंदिया (महावितरण)
२) मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, मुंबई.
-- आपणांस कळविण्यात येते की, टंचाई जाहीर केलेल्या गावातील कृषि ग्राहकांच्या वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये ३३.५ % सवलत देण्यात यावी व दिलेल्या सवलतीपोटी महावितरण कंपनीवर पडणा-या आर्थिकभाराची ग्राहक संख्यनिहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पुर्तता करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यात मदत होईल. वरील तालुक्यातील कृषीपंप ग्राहकांच्या चालू वीज बिलात शासनातर्फे ३३.५% सूट देण्याबाबतचा स्पष्ट उल्लेख वीज देयकात करण्यात यावा.
३) मुख्य महाव्यवस्थापक (सांघिक वित्त), महावितरण, मुंबई.

**प्रत रवाना :-**
अधिक्षक अभियंता, महावितरण, स. व सु. मंडळ, गोंदिया